NAGPURSTUDY.COM

**PMM/KS/15/5728/5862/5888**

# Bachelor of Science [B.Sc./B.C.A./B.Sc. (I.T)]
## Semester-I Examination
## MARATHI
## (Compulsory)

वेळ—तीन तास] [एकूण गुण—60

**सूचना** :— (1) सुवाच्य अक्षरे, मुद्देसूद उत्तरे आणि शुद्धलेखन अपेक्षित.

(2) सर्व प्रश्न अनिवार्य.

1. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा (**200** शब्दात) : 12

   (1) व्यसनाधीनता आणि आजची तरुण पिढी

   (2) निसर्ग आणि मानव.

2. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा (**200** शब्दात) : 12

   सरकारने प्रजेच्या कल्याणाकरिता कोणत्या सुधारणा केल्या आहेत ? आणि शेतकऱ्यांना पाण्याचे महत्व का वाटते ?

   **किंवा**

   प्राचीन युगात आपल्या पूर्वजांना कोणकोणत्या संकटांना तोंड द्यावे लागायचे ?

3. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा (**200** शब्दात) : 12

   'दुरितांचे तिमिर जावो' असे संत ज्ञानेश्वर का म्हणतात ?

   **किंवा**

   'आम्ही कोण ?' या कवितेचे रसग्रहण करा.



rtmnuonline.com Scanned by CamScanner

NAGPURSTUDY.COM

4. खालील प्रश्नांचे उत्तर लिहा :

(अ) महात्मा गांधींना स्टीमरमध्ये प्रवास करताना कोणते अनुभव आले ? 3

किंवा

खंडेरावाचे व्यक्तिचित्र थोडक्यात रेखाटा.

(ब) संत तुकारामांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' असे का म्हंटले आहे ? 3

किंवा

गंगेत स्नान केल्याने पाप नष्ट होत नाही असे तुकडोजी महाराजांना का वाटते ?

(क) खालील म्हणीचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा : 3

'अडला हरी गाढवाचे पाय धरी'

(ड) खालील शब्द शुद्ध करुन पुन्हा लिहा : 3

(i) परिकशा

(ii) किर्तण

(iii) आशिरवाद

(iv) विदयापिठ

(v) सांस्कुतिक

(vi) भुमीका.



rtmnuonline.com Scanned by CamScanner

NAGPURSTUDY.COM

5\. (अ) खालील उताऱ्याचा सारांश तुमच्या शब्दात लिहा : 4

मी सतत चिंतन करीत असतो, गाभा शोधीत असतो तेव्हा मला जाणवते. युवासागराला आपल्या भव्य शक्तीचे भान अद्याप झालेले नाही ! या ढगांना आपल्या लपलेल्या विद्युल्लतेचा पत्ता नाही, अंदाज नाही. या कृष्ण-मेघांना कळत नाही की करंगळीवर क्षितिज पेलणारा कृष्ण सुद्धा याच वयाचा होता. याहूनही लहान होता ! ज्याचे ध्यान आपल्या ध्येयाशी एकटक निगडित झाले आहे तो युवा !

दररोज मी स्वत:ला शोधीत असतो. कधी कधी मी एकाकी असतो, जखम दिसत नाही; पण घायाळ असतो. अशा एकाकीपणात मला अंकुर फुटतात. मी स्वत: विरुद्ध माझ्या पाशीच तक्रार करीत असतो. युवा तो असतो, जो इतरांविरुद्ध नव्हे तर स्वत: विरुद्ध स्वत: जवळच तक्रारी मांडीत असतो. मी ते दु:ख पाहिले. माझ्याजवळ इतकी ताकद होती. मग मी पुढे का सरसावलो नाही ? माझ्यात करुणेची, प्रेमाची शक्ती होती तर काल मी पळून का गेलो ? का त्या प्रसंगाला सामोरा गेलो नाही ? ही अस्पृश्यता, विषमता, अज्ञान, दारिद्र्य, लाचारी मी सहन करु शकत नाही. मग जीवनाच्या रणांगणाकडे जाताना माझी पावले का अशी रेंगाळतात ? कृतीच्या क्षणी मी का माघारी वळतो ? जो लाचारीने शरमिंदा होतो, तो युवा आपल्या या लाचारीवर एकांतात अश्रू ढाळतो. ते क्षण त्याला बळ देत असतात.

(ब) ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी करणारे पत्र प्रकाशकाला लिहा. 4



rtmnuonline.com Scanned by CamScanner

NAGPURSTUDY.COM

(क) खालील इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 4

Mahatmaji was a real leader of men and he led the people. He never played to the gallery or craved to secure cheers from the crowd. Indeed more than at any time, today, there is an urgent need to understand the message of Bapu. He believed in work and according to him, life should be one of ceaseless activity.



rtmnuonline.com Scanned by CamScanner